खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

### मराठी विभाग : पुस्तक भेट उपक्रम

लोकमत

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन आवश्यक : ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन हे एक महत्त्वपूर्ण साधन आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वाचनसंस्कृतीच्या प्रचारासाठी आयोजित 'पुस्तक भेट' उपक्रमात बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. श्वेतांबरी मांडे आणि डॉ. सागर थेऊरकर उपस्थित होते.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी कार्यक्रम आयोजित.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, जीवनातील विविध टप्प्यांवर पुस्तके मार्गदर्शक ठरतात. वाचनाने एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती विकसित होते. भाषिक कौशल्यांच्या आत्मसातीकरणासाठी वाचन हा सर्वोत्तम पर्याय आहे. "मन में है विश्वास" या आत्मकथनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संकटकाळात प्रेरणा मिळेल आणि ते आपापल्या जीवनाला अर्थ प्राप्त करू शकतील, असे त्यांनी आवाहन केले. याप्रसंगी दीक्षा जाधव आणि संस्कार वायकर विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या पुढाकाराने ५० विद्यार्थ्यांना "मन में है विश्वास" या पुस्तकाच्या प्रती देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Aug 13, 2026
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख